महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
वाहतूक खाते,मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८
दूरध्वनी क्र.०२२-२३०२३९००. e mail: gmtraffic@msrtc.gov.in

क्र.राप/वाह/सवलत/ २४८५ दिनांक २२ /०६ /२०२३

प्रति,
विभाग नियंत्रक,
रा.प. मुंबई/ पालघर/ रायगड(पेण)/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ ठाणे/ नाशिक/ धुळे/ जळगांव/ अहमदनगर/ पुणे/ कोल्हापूर/ सांगली/ सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर/ नांदेड/ उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/ भंडारा/चंद्रपूर/वर्धा/गडचिरोली/अकोला/अमरावती/यवतमाळ/ बुलडाणा विभाग.

विषय:- दिव्यांग लाभार्थी तसेच दिव्यांग लाभार्थ्यांच्या साथीदारास युडीआयडी (UDID) कार्डच्या आधारे प्रवास सवलत अनुज्ञेय करणेबाबत.

संदर्भ:- १. परिपत्रक क्र.२०/२०१९,पत्र क्र.राप/वाह/सवलत/अंध-अपंग/४६३५, दिनांक १८.०९.२०१९.
२ .पत्र क्र.राप/वाह/सवलत/१०४७, दिनांक ११.०५.२०२२,
३.पत्र क्र.राप/वाह/सवलत/२७३१, दिनांक ०६.१०.२०२२,
४.पत्र क्र. राप/ वाह/ सवलत/ ३७२५, दिनांक २६.१२.२०२२

*****

गृह विभाग शासन निर्णय क्र. एसटीसी-१०१७/प्र.क्र.५२५/परि-१/दिनांक ०९.१०.२०१८ अन्वये ४० टक्के तसेच त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना रा.प.महामंडळाच्या साध्या तसेच निमआराम बसेसमध्ये ७५ टक्के सवलत अनुज्ञेय करण्यात आली असून ६५ टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या लाभार्थ्यांच्या साथीदारास ५० टक्के प्रवास सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र.राप/वाह/सवलत/अंध-अपंग/४७३०,दिनांक १२.१०.२०१८ अन्वये सर्व विभागीय कार्यालयांस परिपत्रकीय सूचना निर्गमित करण्यात आल्या.

वाहतूक खाते परिपत्रक क्र.४/२०१९, पत्र क्र.राप/वाह/सवलत/१२७३, दिनांक ०५.०३.२०१९ अन्वये दिव्यांग लाभार्थ्यांस व त्यांचे साथीदारास शिवशाही [आसनी] बसेसमध्ये अनुक्रमे ७० टक्के व ४५ टक्के सवलत अनुज्ञेय करण्यात आली.

अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या अनुषंगाने केंद्र शासनाने दिव्यांग व्यक्तींना वैश्विक ओळखपत्र व अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरु केली आहे. परंतु सदरचे देण्यात येणारे वैश्विक ओळखपत्र प्रवासादरम्यान सवलतीकरीता ग्राहय धरण्यात येत नसल्याचे तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने या कार्यालयाचे परिपत्रक क्र.२०/२०१९,पत्र क्र.राप/वाह/सवलत/अंध-अपंग/ ४६३५, दिनांक १८.०९.२०१९, पत्र क्र.राप/वाह/सवलत/१०४७, दिनांक ११.०५.२०२२, पत्र क्र.राप/वाह/सवलत/२७३१, दिनांक ०६.१०.२०२२, पत्र क्र. राप/ वाह/ सवलत/ ३७२५, दिनांक २६.१२.२०२२ अन्वये दिव्यांग लाभार्थ्यांना प्रवास सवलतीकरीता केंद्र शासनाद्वारे देण्यात येणारे वैश्विक ओळखपत्र ग्राहय धरण्याबाबत विभागीय कार्यालयांस कळविण्यात आले आहे.

..२..

Scanned with OKEN Scanner

सदर वैश्विक ओळखपत्रावर आगार व्यवस्थापक यांची सही व शिक्का देणे शक्य नसल्याने ६५ टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या लाभार्थ्यास प्रवासात साथीदार आवश्यक आहे अशा लाभार्थ्यांची तपासणी करुन त्यांस विहित नमुन्यात कागदी पासचा दाखला देण्यात येतो. परंतु असा देण्यात येणारा कागदी पासचा दाखला हा हाताळणे अवघड असल्याने तसेच सदरचा कागदी पास खराब होणे, फाटण्याची शक्यता असल्याने सदर दिव्यांग लाभार्थ्यांच्या साथीदारास (पूर्वी रा.प महामंडळाव्दारे देण्यात येणा-या कागदी पासाशिवाय) दिव्यांग व्यक्तींच्या वैश्विक ओळखपत्रावर नमूद अपंगत्वाच्या टक्केवारीच्या आधारे रा.प.प्रवासभाड्यात सवलत अनुज्ञेय करण्यात यावी.

आपल्या विभागातील सर्व आगार व्यवस्थापक,पर्यवेक्षकीय कर्मचारी तसेच वाहक यांना दिव्यांग लाभार्थ्यांच्या साथीदारास (पूर्वी रा.प महामंडळाव्दारे देण्यात येणा-या कागदी पासाशिवाय) दिव्यांग व्यक्तींच्या वैश्विक ओळखपत्रावर नमूद अपंगत्वाच्या टक्केवारीच्या आधारे रा.प.प्रवासभाड्यात सवलत अनुज्ञेय करण्याबाबत सुचना देण्यात याव्यात. याबाबत कोणतीही प्रवासी तक्रार उद्भवणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

सदरची बाब अत्यंत महत्त्वाची समजुन कार्यवाही करण्यात यावी.

महाव्यवस्थापक (वाहतूक)

Scanned with OKEN Scanner